॥ आनंदवन भुवनी ॥

गायिकाः लता मंगेशकर
गीतः समर्थ रामदास

स्वर्गीची लोटली जेथे, रामगंगा महानदी
तीर्थासी तुळणा नाही, आनंदवन भुवनी ॥ १ ॥

त्रैलोक्य चालिल्या फौजा, सौख्यबंध विमोचने
मोहीम मांडिली मोठी, आनंदवन भुवनी ॥ २ ॥

एथून वाढला धर्मू, रमाधर्म समागमे
संतोश मांडला मोठा, आनंदवन भुवनी ॥ ३ ॥

भक्तांसी रक्षिले मागे, आताहि रक्षिते पहा
भक्तासी दिधले सर्वे, आनंदवन भुवनी ॥ ४ ॥

येथून वाचती सर्वे, ते ते सर्वत्र देखती
सामर्थ्य काय बोलावे, आनंदवन भुवनी ॥ ५ ॥

उदंड जाहले पाणी, स्नानसंध्या करावया
जपतप अनुष्ठाने, आनंदवन भुवनी ॥ ६ ॥

बुडाली सर्व ही पापे, हिंदुस्थान बलावले
अभक्तांचा क्षयो झाला, आनंदवन भुवनी ॥ ७ ॥